**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ, नागपूर.**

रिट याचिका क्र. १६/२०२३

मेसर्स नानक कन्स्ट्रक्शन,

भागीदारी संस्था तिच्या भागीदाराच्या माध्यमातून

आमुखत्यारपत्र धारक रोशन पंजाबराव पाटील,

वय ३८ वर्ष,धंदा - व्यवसाय, राहणार - गणेश मंदिराजवळ,

धंतोली, काटोल, जिल्हा - नागपूर. ...... याचिकाकर्ता

**- विरुद्ध -**

१. महाराष्ट्र राज्य,

मार्फत सचिव,

पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग,

मंत्रालय, मुंबई ३२,

२. जिल्हा परिषद नागपूर,

मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी,सिव्हिल लाइन्स, नागपूर.

३. कार्यकारी अभियंता,

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,

जिल्हा परिषद, नागपूर ...... उत्तरवादी

श्री. अभय सांबरे याचिकाकर्त्याचे वकील ,

श्री. एस. एम. घोडेस्वार उत्तरवादी क्र. १ साठी सहाय्यक सरकारी वकील,

श्री. पी. के. सत्यनाथन उत्तरवादी क्र. २ आणि ३ चे वकील.

**न्यायमंच: न्या. ए. एस. चांदुरकर आणि न्या. श्रीमती वृषाली व्ही. जोशी.**

**दिनांक : २०.१.२०२३.**

**मौखिक न्यायनिर्णय :** (न्या. ए. एस. चांदुरकर द्वारे)

म्हणणे ऐकले. **अधिनिर्णय** . अधिनिर्णय जारी करून त्यावर उत्तर तत्काळ मागविण्यात आले. पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने म्हणणे अंतिमतः ऐकले.

प्रस्तुत याचिकेत राज्य सरकारच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने ३०/१२/२०२२ रोजी जारी केलेल्या पत्राला आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याच्या प्रस्तावावर विचार सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात देण्यात आली आहे. सदर पत्राच्याआधारे, याचिकाकर्त्याच्या एकाहि निविदेला प्रतिसाद मिळाला नाही आणि त्यानुसार उत्तरवादी क्र.२ ने मागविलेल्या इतर निविदांमध्ये याचिकाकर्त्याला सहभागी होण्याची परवानगी दिली नाही. जिल्हा परिषदेने सुमारे १० कामांकरिता निविदा मागविल्या ज्याला याचिकाकर्त्याने प्रतिसाद देऊन आपला निविदा अर्ज सादर केला. परंतु याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याबाबत राज्य सरकारच्या अनुदेश प्रतीक्षेत असल्याच्या आधारावर, सदर निविदा संदर्भात याचिकाकर्त्याचा अर्ज क्रमांक २०२२_NAGPU_८५७६९०_२ उघडण्यात आला नव्हता. याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याचा कोणताही आदेश पारित झाला नसल्यामुळे त्याला निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करणारी प्रस्तुत रिट याचिका ज्यावेळी दाखल करण्यात आली त्यावेळी इतर कामांच्या आर्थिक निविदा उघडल्या गेल्या नव्हत्या.

३. याचिकाकर्त्याचे विद्वान वकील श्री. अभय सांबरे यांनी निविदा दस्तावेजातील संबंधित खंडाकडे आमचे लक्ष वेधले. खंड १५ नुसार, जर कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले/निविदा प्रक्रियेत सहभाग घेण्यापासून अवरुद्ध करण्यात आले किंवा त्याची नोंदणी रद्द करण्यात आली तर तो अपात्र ठरेल. अर्जदारास कोणत्याही सरकारी विभाग/सरकारी स्थानिक संस्था किंवा सरकारी उपक्रमांनी आपल्याला काळ्या यादीत

टाकलेले नाही, असे स्वयं घोषणा पत्र सादर करणे आवश्यक आहे. आज पर्यंत काळ्या यादीत टाकण्याचा कोणताही आदेश नसल्यामुळे याचिकाकर्त्याने तसे हमीपत्र दिले आहे. केवळ काळ्यायादीत टाकण्याचा प्रस्ताव आहे, या आधारावर याचिकाकर्त्याला निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यापासून रोखले जाऊ शकत नाही. त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ विद्वान वकील यांनी **केयरटेल इन्फोटेक लि. -विरुद्ध- हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि इतर २०१९ (१४) एस सी सी ८१ मध्ये प्रकाशित** केलेल्या न्यायनिर्णयावर विश्वास ठेवला. त्यानुसार याचिकाकर्त्याला निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात यावी, असे सादर केले.

४. उत्तरवादी क्र. २ आणि ३ चे विद्वान वकील पी. के. सत्यनाथन यांनी रिट याचिकेला विरोध केला. याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू असल्याने दिनांक ३०/१२/२०२२ रोजी जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या पत्रानुसार, याचिकाकर्ता निविदा प्रकियेत सहभागी होण्यास पात्र नाही, असे त्यांनी सांगितले. याचिकाकर्त्याच्या विरोधात अंदाजे तीन गुन्हे दाखल होते आणि त्याच कृतीचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा परिषदेने याचिकाकर्त्याला प्रतिबंधित करणे समर्थित आहे. दिनांक ०७/१२/२०२१ चा शासन निर्णय आणि विशेषतः खंड २.२, २.९ आणि २.१५ प्रमाणे ही कारवाई करण्यात आली आहे या कडे लक्ष वेधण्यात आले. **एन. जी. प्रोजेक्टस लिमिटेड -विरुद्ध- विनोद कुमार जैन आणि इतर (२०२२) ६ एससीसी १२७** मधे प्रकाशित केलेल्या न्यायनिर्णयावर विश्वास ठेऊन पुढे सादर केले की अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करण्याची न्यायालयाने घाई करू नये. त्यामुळे विद्वान वकिलांनी याचिकाकर्त्याला कोणताही दिलासा देता येणार नाही, असे सादर केले.

५. पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकल्यावर आणि कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की आजपर्यंत याचिकाकर्त्याविरोधात त्याला काळ्या यादीत टाकण्याचा कोणताही आदेश पारित झालेला नाही हे निर्विवाद

आहे. याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया संबंधित प्राधिकाऱ्याच्या विचाराधीन असल्याचे सांगण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक ०७/१२/२०२१ च्या शासन निर्णयवर विश्वास ठेवण्यात आला. योग्य प्रकरणात काळ्या यादीत टाकण्याची कारवाई समर्थित ठरू शकते या विधानाशी कोणताही वाद असू शकत नाही, परंतु काळ्या यादीत टाकण्याचा आदेश असल्याशिवाय बोलीदाराला निविदा प्रक्रियेत विनाअडथळा सहभागी होण्याचा हक्क आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यापासून त्याला काळ्या यादीत टाकण्याचा/बंदी घालण्याचा आदेश त्याच्याविरुद्ध पारित झालेला नाही, अशी हमी देणारे लेखी प्रतिज्ञापत्र बोलीदाराला सादर करावे लागेल. यावरून अशी पूर्वकल्पना येते कि काळ्या यादीत टाकण्याचा आदेश अस्तित्वात आहे. हाती असलेले प्रकरण त्या प्रकारचे नाही. जिल्हा परिषदेच्या म्हणण्यानुसार सुद्धा याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रलंबित आहे. अशा प्रकारे याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्याच्या कोणत्याही आदेशाअभावी त्याला त्या आधारावर निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यापासून रोखले जाऊ शकत नाही. <u>केयरटेल इन्फोटेक लि.</u> (उपरोल्लेखित) मधील निर्णयाच्या परिच्छेद २४ मधे खालील प्रमाणे निदर्शनास आले आहे की -

> “२४ आपण या पैलूकडे दुसऱ्या दृष्टीकोनातून देखील पाहू शकतो. काळ्या यादीत टाकण्याचे खूप गंभीर दुष्परिणाम आहेत. कारणे दाखवा नोटीसच्यापरिणामी काळ्या यादीत टाकले जाऊ शकते किंवा काळ्या यादीत टाकले जाऊ शकत नाही. केवळ कारणे दाखवा नोटीस जारी करण्याचे बोलीदारावर इतके गंभीर परिणाम होऊ शकतात, हे मान्य करणे कठीण आहे.”

६ <u>एन. जी. प्रोजेक्ट्स लिमिटेड</u> (उपरोल्लेखित) मधील निर्णयाचा संदर्भ निविदा प्रकरणांमध्ये भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकार क्षेत्राचा वापर करताना हस्तक्षेप करण्याच्या मापदंडशी आहे. उपरोक्त निर्णय त्यानंतर <u>जय भोलेनाथ कन्स्ट्रक्शन -विरुद्ध- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड आणि इतर</u>

(दिवाणी अपील क्र. ४१४०/२०२२ निर्णीत दिनांक १८.०५.२०२२) या प्रकरणी स्पष्ट करण्यात आला आहे की बोली नाकारण्यात अधिकारांचा मनमानी वापर झाला असेल तर हस्तक्षेप समर्थित असू शकतो.

७. आम्हाला असे आढळले आहे की, प्रस्तुत प्रकरणात याचिकाकर्त्याला काळ्यायादीत टाकण्याकरिता कोणताही आदेश नसल्यामुळे, त्या कारणावरून याचिकाकर्त्याला निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यापासून रोखणे जिल्हा परिषदेला समर्थित नव्हते.

८. वरील कारणास्तव, याचिकाकर्त्याने सादर केलेल्या निविदा अर्जच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याचा याचिकाकर्त्याला हक्क आहे. जिल्हा परिषदेने निविदा सूचनेनुसार याचिकाकर्त्याच्या निविदा अर्जाचा विचार करावा आणि निविदा अर्ज केवळ दिनांक ३०/१२/२०२२ च्या पत्राच्या दृष्टीने नाकारला जाणार नाही. भविष्यात जर याचिकाकर्त्याला काळ्या यादीत टाकण्यात आले तर कायद्यानुसार उत्तरवादी त्या पैलूचा विचार करण्यास स्वतंत्र आहेत हे सांगण्याची गरज नाही.

९. वरील अटींनुसार याचिका मंजूर करण्यात आली. त्याअनुषंगाने विधिनिर्णय. खर्चाबद्दल आदेश नाही.

१०. न्यायनिर्णयाची अधिकृत प्रत पक्षकारांचे विद्वान वकीलांना देण्यात यावी .

(न्या. वृषाली व्ही. जोशी) (न्या. ए. एस. चांदुरकर)

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."